दिन विशेष...

१७६० : कुतुबशहाने दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला.
१८४० : इंग्लंडने पेनी पोस्ट सेवा सुरु केली.
१९२० : जिनिव्हा येथे राष्ट्रसंघाची स्थापना झाली. याच दिवशी युनोचे पहिले अधिवेशन भरले.
१९६६ : भारत-पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,५७६.२४ -६०४.७२(०.७२%)
डॉलर ₹ ९०.१९

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०७ |
| मुंबई | ३३ | १६ |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २८ | ०८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६२ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

चुका करा, पण त्यातून शिकून पुढे चला प्रत्येक अडथळा हा यशाकडे जाणारा मार्ग आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:०४

### सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,७४०/- २,४९,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# उमेदवारी अर्ज पुन्हा दाखल करून घेण्याबाबतची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

## मुंबई महापालिका निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्यांची निराशा

वृत्तसंस्था । मुंबई



**पुढील आठवड्यात होणारी मुंबई महापालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक उमेदवारांच्या पदरी उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शुक्रवारी निराशाच पडली. विविध कारणास्तव फेटाळण्यात आलेल्या या उमेदवारांचे अर्ज पुन्हा दाखल करून घेण्याची मागणी मान्य करणे हे शेवटच्या क्षणी निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्यासारखे आहे, असे नमूद करून याप्रकरणी दाखल केलेली जनहित याचिका न्यायालयाने फेटाळली.**

याचिककर्त्याने केलेली मागणी जनहित याचिकेद्वारे केली जाऊ शकत नाही, हा महापालिका वकिलांचा मुद्दाही न्यायालयाने यावेळी योग्य ठरवला. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक १५ डिसेंबर रोजी जाहीर झाल्याचे आणि पुढील आठवड्यात निवडणूक असल्याचेही न्यायालयाने याचिका फेटाळताना प्रामुख्याने नमूद केले.

मुंबईतील प्रभाग क्रमांक १ ते २२७ चे निवडणूक निर्णय अधिकारी, तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या महापालिका आयुक्तांनी या उमेदवारांचे अर्ज विविध कारणांस्तव फेटाळले होते. तथापि, सत्ताधारी पक्षाला खूश करण्यासाठी हे अर्ज फेटाळले असावेत, असा संशय व्यक्त करून वांद्रेस्थित व्यावसायिक मोझम अली मीर यांनी याप्रकरणी जनहित याचिका दाखल केली होती. तसेच, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दिलेली सात दिवसांची मुदत अत्यंत कमी असल्याचा दावा करून फेटाळलेले उमेदवारी अर्ज पुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती.

मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही याचिका सादर करण्यात आली, तेव्हा न्यायालयाने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली होती व प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले होते. या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे शुक्रवारी या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावेळी, महापालिकेच्या वतीने याचिकेतील मुख्य मागणीबाबत आक्षेप नोंदवण्यात आला आणि जनहित याचिकेद्वारे अशी

(पान २ वर)

**पाणी, मालमत्ता कर आणि बांधकाम प्रस्ताव यासारखे विभाग महानगरपालिकेच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी मनमानी, अवाजवी आणि घटनेच्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. विरोधी पक्षांच्या उमेदवारांना ना-हरकत प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब करून राजकीय कटकारस्थान होण्याची दाट शक्यताही याचिकेत वर्तवण्यात आली होती.**

### याचिकेत नेमके काय?

जिल्हा निवडणूक अधिकारी आणि विभाग क्रमांक १ ते २२७ च्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सामान्य जनता व विरोधी पक्षांच्या असंख्य उमेदवारांचे उमेदवारी अर्ज किरकोळ, अति-तांत्रिक आणि अवैधानिक कारणांवरून मनमानीपणे फेटाळले. या अधिकाऱ्यांच्या मनमानी, अरेरावीच्या आणि असंविधानिक कृतींमुळे व्यथित होऊन आपण ही याचिका केल्याचा दावा मीर यांनी याचिकेत केला गेला होता. उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास मनमानीपणे नकार दिल्यामुळे अनेकांनी लोकप्रतिनिधित्व कायद्यांतर्गत निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याचा आपला हक्क गमावला आहे आणि हा राज्य निवडणूक आयोगाचे (एसईसी) घटनात्मक अधिकार रद्द करण्याचा महानगरपालिका प्रशासनाचा थेट प्रयत्न असल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला होता.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात ३००० रुपये जमा होणार

प्रतिनिधी । जळगाव



**गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत तसेच नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदांच्या निवडणुकांमध्ये लाडकी बहीण योजना गेम चेंजर ठरली. त्यामुळे महाविकास आघाडीला महायुतीपुढे सपशेल शरणागती पत्करावी लागली. ही स्थिती लक्षात घेता महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी लाडक्या बहिणींसाठी मोठी घोषणा केली आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात मकरसंक्रांतीपूर्वी डिसेंबर व जानेवारी महिन्याचे दोन हप्ते रुपये ३००० जमा केले जाणार असल्याची घोषणा ना. गिरीश महाजन यांनी केली आहे.**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे. मकर संक्रांतीपूर्वी लाडक्या बहिणींना दिलासा देणारी ही मोठी भेट ठरेल, असे मंत्री महाजन यांनी आपल्या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये नमूद केले आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या या आर्थिक मदतीमुळे अनेक महिलांना दैनंदिन खर्च, शिक्षण आणि आरोग्य विषयक गरजांसाठी आधार मिळतो. त्यामुळे मंत्री महाजन यांनी मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर लाडक्या बहिणींना दिलासा देणारी मोठी घोषणा महायुती सरकारने केल्याचा दावा केला आहे.**

राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना दरमहा १५०० आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेला राज्यातील महिला वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळत असून, महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारने मोठा निर्णय घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. महिलांमध्ये सरकारबद्दल सहानुभूती निर्माण करणे आणि महिला मतदारांना आकर्षित करण्याचा हा प्रयत्न असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी देवाभाऊंकडून म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून लाडक्या बहिणींना

(पान २ वर)

### थोडक्यात

#### मध्य रेल्वेचा 'फुकट्या' प्रवाशांना दणका

**मुंबई ।** मध्य रेल्वेने प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक प्रवास देण्यासाठी विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी मोहीम हाती घेतली आहे. विनातिकीट प्रवाशांना आळा घालण्यासाठी वारंवार तिकीट तपासणी मोहीम राबवण्यात येत आहेत. मध्य रेल्वेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ३०.७५ लाख अनधिकृत व विनातिकीट प्रवाशांना पकडले. त्यांच्याकडून दंड स्वरुपात १८३.१६ कोटी रुपये वसूल करण्यात आले. मध्य रेल्वेच्या विशेष तिकीट तपासणी पथकांने एप्रिल डिसेंबर २०२५ दरम्यान ३०.७५ लाख विनातिकीट प्रवाशांना पकडले. मागील आर्थिक वर्षात याच काळात २८.०१ लाख विनातिकीट प्रवाशांना पकडले होते. गतवर्षीच्या तुलनेत २०२५ मध्ये यात १० टक्क्यांनी वाढ झाली.

#### नाशिकच्या मातीत ठाकरे बंधू पुन्हा एकत्र

**नाशिक ।** गोदावरी काठावरील घारपुरे घाट भागात २००३ मध्ये गोदापार्कच्या भूमिपूजन सोहळ्यात एकसंघ शिवसेनेतील उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले होते. या सोहळ्याचे भूमिपूजन तत्कालीन महापौर दशरथ पाटील यांना खरंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते करावयाचे होते. परंतु, त्यांनीच उद्धव आणि राज ठाकरे यांना निमंत्रित करण्याची सूचना केली. त्यानुसार हा कार्यक्रम पार पडला. तेव्हा पक्षांतर्गत असलेली रस्सीखेच आज दोन विभिन्न पक्षात परावर्तित झाली आहे. बदललेल्या राजकीय परिस्थितीत जवळपास २३ वर्षांनंतर ठाकरे बंधू नाशिकमध्ये पुन्हा एकत्र आले.

# भाजप म्हणजे 'आस्तीन के साप'

## जाती-धर्माचे राजकारण हाच त्यांचा अजेंडा : माजी आ.संतोष चौधरी

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय जनता पक्षाचे लोकं 'आस्तीन के साप' आहे. ही लोकं धर्मा धर्मात भांडणे लावण्याचे काम करतात. जाती-धर्माचे राजकारण हाच त्यांचा मुख्य अजेंडा आहे. भाजप कुत्र्याच्या शेपटीप्रमाणे आहे, त्याची शेपटी वाकडी ते वाकडीच राहणार, अशी घणाघाती टीका भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी यांनी केली.**



ते प्रभाग क्रमांक १४ मधील उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी, तडवी नाजमीन मकबूल, सना शेख रियाज, जमीलोनुद्दीन शेख शारिफूद्दीन शेख यांच्या प्रचारार्थ तांबापूर येथील शहीद अब्दुल हमीद चौक येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होते. सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगर जिल्हाध्यक्ष एजाज मलिक, जामनेरचे नगरसेवक जावेद मुल्ला, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे, डॉ. अभिषेक ठाकूर, अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मजहर पठाण, डॉ. रागीब अहमद, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी, नाजमीन मकबूल तडवी, सना शेख रियाज, जमीलोनुद्दीन शेख शारिफूद्दीन शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना माजी आ. चौधरी म्हणाले की, भाजपवाले मोठं-मोठी पोस्टर लावतं आहेत. एवढे करोड आणले, तेवढे करोड आणले. दोन करोडचा एक रस्ता बनवला, असे सांगत आहेत. त्या कामाला किती पैसे लागतात हे आमचा मिस्तरी देखील सांगू शकतो, असे सांगून अशा लोकांनी या गावाला लुटले आहे, आता तुमची वेळ आहे त्यांना लुटायची. त्यांना सोडू नका, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

सभेला संबोधित करताना डॉ. अभिषेक ठाकूर यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत पदाकरिता आणि सत्ता मिळावी याकरिता विरोधी उमेदवार हे वारंवार इकडून तिकडे उड्या मारत असतात, असे सांगून त्यांनी 'नथनीय कई बार सात बदल देते है, पुण्य की आड मे पाप बदल देते है, मतलब के

(पान २ वर)

### समाजकारण करणार : लाडवंजारी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक लाडवंजारी यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. निवडणूक लागल्यानंतर घोषणाबाजी केली जात आहे. ते तीन वेळा निवडून आले. महापौर, विरोधीपक्षनेते राहिले. पण विकास करू शकले नाहीत. आता सातबारा नावावर करू, स्वच्छतागृहासह इतर सुविधा देण्याचे आश्वासन देत आहेत. मग या आधी काय केले? असा प्रश्न उपस्थित करत, आम्ही राजकारण नाही तर समाजकारण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी बोलताना दिले.




मुंबई : नव्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच पुन्हा एकदा राज्यभर थंडीची लाट येण्याचे संकेत मिळाले असून ९ जानेवारीपासून गारठा अधिक वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन नवव्यांदा मांडणार बजेट

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**देशाच्या अर्थकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बजेट २०२६ च्या तारखा अखेर जाहीर झाल्या आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या १ फेब्रुवारी रोजी संसदेत आपला नववा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या अर्थमंत्री ठरणार आहेत.**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अभिभाषणाने होईल. संसदीय कार्य समितीने निश्चित केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार, २९ जानेवारी रोजी बीटिंग रिट्रीट सोहळ्यामुळे संसदेचे कामकाज होणार नाही.

(पान २ वर)

### असे असेल वेळापत्रक:

### २८ जानेवारी: राष्ट्रपतींचे अभिभाषण

- ३० जानेवारी: आर्थिक पाहणी अहवाल सादर होणार.
- १ फेब्रुवारी (रविवार): केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाईल.
- १३ फेब्रुवारी: अधिवेशनाचा पहिला टप्पा संपणार.
- ९ मार्च ते २ अप्रैल: अधिवेशनाचा दुसरा टप्पा पार पडेल.
- ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे आणि त्यानंतर शनिवार-रविवार सुट्टी असल्याने, हे अधिवेशन २ एप्रिल रोजीच समाप्त होण्याची शक्यता आहे.

### मोरारजी देसाईंच्या विक्रमाच्या दिशेने वाटचाल

**निर्मला सीतारामन या यंदा ९ व्यांदा अर्थसंकल्प सादर करत आहेत. भारताच्या इतिहासात सर्वाधिक १० वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या नावावर आहे. या अर्थसंकल्पानंतर सीतारामन या विक्रमाच्या अगदी जवळ पोहोचतील.**

# नाशिकमध्ये २४ लाखांचे ड्रग्ज जप्त

## लष्करात पुरवठा केल्याचा संशय, तिघे अटकेत

वृत्तसंस्था । नाशिक

शहरासह जिल्ह्यात मॅफड्रोन (एमडी) व गांजाची तस्करी सुरू असताना आता थेट लष्कराच्या तळापर्यंत नशेचा बाजार सुरू झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.



शहर पोलिसांच्या पथकांनी लष्करी छावणीच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या कॅथे कॉलनीत टाकलेल्या छाप्यात ॲम्फेटामाइन नावाचा चोवीस लाखांचा अमली पदार्थ जप्त केले आहेत. त्याप्रकरणी तिघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यांनी लष्करात ड्रग्जचा पुरवठा केल्याचा संशय असून पुढील तपास सुरू आहे. देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यातील अंमलदार राजेंद्र गुंजाळ यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुन्ना कल्लु कोल (वय ४०), शांती मुन्ना कोल (३३), अमर मुन्ना कोल (१९, सर्व रा. सतना, मध्यप्रदेश) अशी संशयितांची नावे आहेत. हे सर्वजण मजूर असून काही महिन्यांपासून देवळाली कॅम्प पोलिस ंच्या हद्दीत वास्तव्यास आहेत. गुरुवारी (दि. ८) पहाटे पाच वाजेच्या सुमारास देवळाली कॅम्प पोलिस व अमली पदार्थ विरोधी पथकाने (एनडीपीएस) छापा टाकला. त्यावेळी कोल याच्या लेबर रूममध्ये गांजा आणि ॲम्फेटामाइन या अमली पदार्थांचा साठा आढळून आला. त्यांनी पांढऱ्या रंगाच्या चौकोनी आकारातील कागदात ॲम्फेटामाइन हा पदार्थ गुंढाळून ठेवला होता. देवळाली कॅम्पचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांच्या पथकासह 'एनडीपीएस'ने ही कारवाई केली आहे.

### ...असा लागला छडा

**लष्करी छावणीच्या प्रवेशद्वारासमोरच अमली पदार्थांच्या साठा आढळल्याने खळबळ उडाली आहे. हे अमली पदार्थ लष्करी छावणी परिसरातील काही जवानांपर्यंत पोहोचल्याचे समोर येत आहे. लष्करातील व्यक्तिंना हे पदार्थ पोहोचल्याचे समजल्यानंतर सैन्यातील काही अधिकाऱ्यांनी पोलिसांना त्यासंदर्भात कळवले. त्यानुसार पोलिसांनी परिसरात गोपनीय माहिती संकलित करुन संशयितांभोवती सापळा रचून ही कारवाई केली. या नशेच्या बाजारातून अद्याप कोणताही गंभीर स्वरुपाचा प्रकार लष्करात घडला नसल्याचे कळते. मात्र, लष्करी यंत्रणांपर्यंत नशेचा विळखा पोहोचल्याने यंत्रणादेखील सतर्क झाल्या आहेत.**

## संपादकीय

### सत्ताकारण

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही घडते आहे त्यामुळे चांगल्या चांगल्यांना अवाक् केले आहे. बोलायचे काय किंवा बोलायचे तरी कशाला येथपर्यंत सगळ्या गोष्टी पोहोचल्या आहेत. देश आणि राज्यपातळीवर भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस परस्परांचे कट्टर प्रतिस्पर्धी आहेत. तसाच असदुद्दीन ओवेसी यांचा एमआयम पक्षही भाजपला न चालणारा. कदाचित भाजपला पक्ष म्हणून एकवेळ चालेलही, मात्र भाजपच्या समर्थकांना ओवेसींच्या पक्षाशी केलेली जवळीक मान्य होणार नाही. समर्थक म्हणजे पक्षाचे नेते, पदाधिकारी अथवा कार्यकर्ते नाही तर पक्षाला विचारधारेच्या आधारावर मत देणारा मतदार. तरीही राज्यात भाजपची दोन ठिकाणी या दोन पक्षांशी युती झाली. अल्पावधीसाठीच झालेली ही युती तुटल्याचे प्रथमदर्शनी दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात तसे नाही आणि त्यातही भाजपने दुसरा मार्ग काढत आपला हेतू साध्य करून घेतला. हा हेतू म्हणजे अर्थातच त्या ठिकाणच्या सत्ताप्राप्तीचा. यावरून राजकारणात आता विचारधारेपेक्षा सत्ताकारण महत्त्वाचे झाले असल्यावर शिक्कामोर्तब केले गेले. अंबरनाथ आणि अकोट या दोन ठिकाणी ही विचित्र जुळणी झाली. अंबरनाथमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सर्वाधिक जागा मिळाल्या. त्यांना सत्तेबाहेर ठेवण्यासाठी भाजपने अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सोबत घेतले. राज्याच्या सत्तेत हे तीनही पक्ष सहभागी असताना स्थानिक निवडणुकांमध्ये परस्परांच्या विरोधात लढत असल्यामुळे शिंदेंना स्पर्धक म्हणून शह देण्यासाठी भाजपने अन्य मित्र असलेल्या स्पर्धकाची मदत घेणे एकवेळ ठीक. तथापि, ज्या काँग्रेसमुक्त भारताचा पक्षाकडून नारा बुलंद केला जातो त्या काँग्रेसलाच सोबत घेत भाजपने शिंदेसेनेला शह दिला. काँग्रेसने भाजपच्या प्रेमात पडलेल्या १२ नगरसेवकांना नोटीस दिली आणि गंमतीची बाब म्हणजे नोटीस येताच काँग्रेसच्या नगरसेवकांनी चक्क भाजपत प्रवेश केला. भाजपला जे साध्य करायचे ते त्यांनी केलेच, त्यात मोठा पक्ष असूनही शिंदेसेनेला बाद केले आणि १२ जागा जिंकून आपली ताकद दाखवणाऱ्या काँग्रेसला मोडीतच काढले. हा पराभव शिंदे आणि काँग्रेसच्या जिव्हारी लागणे स्वाभाविक आहे. मात्र त्याहूनही अधिक कोणी यात अचंबित आणि नाउमेद झाले असतील ते मतदार ज्यांनी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी केले. या नगरसेवकांनी त्यांच्यावर मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाशी प्रातारणा केली. काँग्रेस आणि एमआयएमसोबत अशी स्थानिक पातळीवर आघाडी झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळल्यावर त्यांनी जाहीर नाराजी दर्शवली होती. ज्यांनी हे केले आहे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असेही ते म्हणाले होते. त्यापुढे अकोटमध्ये काय झाले ते अद्याप समोर आले नसले तरी अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करून स्वतःला पावन करून घेतले. जिल्हा परिषदा, नगरपालिका अथवा महापालिकांच्या निवडणुका अशा असतात की जेथे साधारणपणे स्थितीनुसार निर्णय घेण्याची सुट स्थानिक नेतृत्वाला दिली जाते. किमान असे पूर्वी म्हटले जायचे आणि तसे ते होतेही. आता त्यावर विश्वास ठेवण्याची कोणाची तयारी नाही. कारण ज्या प्रकारे राज्याचे नेतृत्व करणारे नेते आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असणारे नेते या स्थानिक निवडणुकांत आचरट प्रकार करत आहेत त्यावरून सत्ता संपादन हे त्यांचे एकमेव लक्ष्य असून स्थानिक नेत्यांना केवळ री ओढण्यासाठी ठेवले आहे. वर जो निर्णय घेतला जाईल त्याला केवळ मम म्हणायचे काम त्यांना ठेवले आहे. शिंदेसेनेने अंबरनाथ प्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. या पक्षात आणि भारतीय जनता पार्टीत कुरबुरी सुरू असल्याच्या बातम्या सरकार स्थापन झाल्याच्या दिवसापासून सुरू आहेत. अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील पत्रकार परिषदांमध्ये भाजपवर पूर्वी कधीही कोणी केली नव्हती एवढी प्रखर टीका भाजपच्या सोबत राहूनच केली आहे. याकडे ठरवून केलेले नाट्य म्हणून जरी पाहिले जात असले तरी त्यातून भ्रष्टाचाराचे जे आरोप केले गेले किंवा ज्या प्रकरणांमुळे निर्देश केला गेला ती प्रकरणे तर खोटी नाहीत. मतदारांना निवडणुकीच्या मोसमात त्याचे स्मरण करून देणे म्हणजे पाणी बरेच मुरते आहे. वास्तविक स्थानिकच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच एकमेकाच्या स्थानिक नेत्यांना आपल्या कंपूत सामिल करून घेण्याची स्पर्धा शिगेला पोहोचली होती. नाराजी फारच वाढल्यावर आता परस्परांचे नेते आणि पदाधिकारी फोडायचे नाहीत असा करारही झाला. एवढे सगळे घडल्यावरही जनमताचा जो कौल आहे तो डावलण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे. आघाडी अथवा युतीमधील पक्षांमध्ये मतभेद असोत वा मनभेद, त्यांना ते लखलाभ. आता त्याकडे सामान्य गोष्ट म्हणून दुर्लक्ष करण्याचीही सगळ्यांना सवय झाली आहे; पण आपल्याच मित्राच्या विरोधात आपल्या कट्टर विरोधकाशी हातमिळवणी करत मित्राला एका ठिकाणच्या सत्तेतून बेदखल करत दुसर्या ठिकाणी त्याच्यासोबत सत्ता उपभोगण्याचा प्रकार अचंबित करणारा आहे. राज्यातील राजकारण या थराला कधी गेले नव्हते.

# अजिंठा कला महोत्सवाचे उद्घाटन ८०० कलाकृतींचे सुंदर प्रदर्शन

## विविध मान्यवरांनी केले कलाकारांचे कौतुक, अजिंठा लेणीच्या पायथ्याशी चित्रमयी कलाविष्कार

प्रतिनिधी । जळगाव

**अजिंठा आर्ट सोसायटी तर्फे आयोजित मअजिंठा कला 'होत्सवा'चे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. जळगाव, जामनेर, खिरोदा आणि छत्रपती संभाजीनगर येथील कलाकारांच्या सहभागातून साकारलेल्या या महोत्सवात तब्बल ८०० कलाकृती मांडण्यात आल्या आहेत.**




या महोत्सवाचे उद्घाटन यु. यु. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, तर भरत गडरी यांनी दीपप्रज्वलन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सागरमल जैन होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्नेहदिप गरुड, विलास धनसिंग राजपूत, किरण सुर्यवंशी, ए. ए. पटेल, स्नेहल पाटील, पी. पी. साबळे (सहायक पोलीस निरीक्षक, फर्दापूर), आर. एस. चौधरी, व्ही. आर. पाटील, एस. के. पाटील, एस. टी. चिचोले, फिरोज पठाण आणि शेख झाकिर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवप्रसाद जोशी यांनी केले.

अजिंठा आर्ट सोसायटीच्या स्थापनेमागील उद्दिष्टे स्पष्ट करताना सांगितले की, अजिंठा शैलीसह चित्रकला, संगीत, शिल्प आणि नाट्य या अभिजात कलांचा प्रसार करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. संस्थेच्या २२ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा त्यांनी यावेळी घेतला. यु. यु. पाटील यांनी कला महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक करून कलाकारांना प्रोत्साहन दिले. तर भरत गडरी यांनी, ग्रामीण भागात कलेचा अधिक प्रसार होण्याची गरज असून ठिकठिकाणी चित्रकलेची छोटी प्रदर्शने भरवावीत, असे मत व्यक्त केले.

# जि.प.च्या बोगस दिव्यांग दोघा कर्मचाऱ्यांचे निलंबन

प्रतिनिधी । जळगाव

राज्याच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील दिव्यांग कर्मचारी व दिव्यांग व्यक्तींच्या दिव्यांग प्रमाणपत्राची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.या तपासणीत जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागातील दोन कर्मचाऱ्यांवर दिव्यांगत्व तपासणी अहवालात आवश्यक त्या निकषांनुसार टक्केवारी आढळून न आल्यानेमुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी निलंबनाची कारवाई केली आहे.

पाचोरा पंचायत समितीत कार्यरत वरिष्ठ सहाय्यक लेखा विक्रम सुरेश पाटील तसेच धरणगाव पंचायत समितीत कार्यरत कनिष्ठ सहाय्यक लेखा संतोष लक्ष्मण पाटील यांची नियुक्ती दिव्यांग प्रवर्गातून करण्यात आली होती. या अनुषंगाने दोघांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे दिव्यांगत्व तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान विक्रम सुरेश पाटील यांचे युडीआयडी कार्ड अल्पदृष्टी प्रवर्गातील ७० टक्के दिव्यांगत्वाचे असताना प्रत्यक्ष तपासणीत त्यांची दिव्यांगत्व टक्केवारी १० टक्के असल्याचे निष्पन्न झाले. तसेच श्री. संतोष लक्ष्मण पाटील यांचे क्षीण दृष्टी प्रवर्गातील ४० टक्के दिव्यांगत्वाचे युडीआयडी कार्ड असतानाही वैद्यकीय तपासणीत त्यांची दिव्यांगत्व टक्केवारी शून्य टक्के आढळून आली.

या प्रकरणात शासनाची दिशाभूल केल्याचा ठपका ठेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी शुक्रवार दिनांक ०९ जानेवारी रोजी दोन्ही कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे.

## आर्यन फाउंडेशनतर्फे व्याख्यानाचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

आर्यन फाउंडेशनतर्फे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त रविवार दि.११ रोजी दुपारी ४.३० वाजता सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सावखेडा येथील चाणक्य सभागृहात हे व्याख्यान होणार असून या व्याख्यानात डॉ. मुलमुले हे सुख म्हणजे नक्की काय असतं या विषयावर संवाद साधणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ.व्ही. एल. माहेश्वरी यांची अध्यक्षस्थानी उपस्थिती असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी असे आवाहन अध्यक्ष डॉ.रवी महाजन, डॉ.रेखा महाजन, डॉ.अश्विनी महाजन-गोडसे यांनी केले आहे.

# सर्व विभागांनी जिल्हास्तरीय नियोजनात संसाधनांचा प्रभावी वापर करावा

## जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या सुचना; भूजल डेटा व जलचर मॅपिंगचा वापरवर पार पडली कार्यशाळा

प्रतिनिधी । जळगाव

**नागपूर येथील केंद्रीय भूमिजल बोर्डतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात 'जिल्ह्यातील भूजल डेटा आणि जलचर मॅपिंगचे प्रसारण व वापर' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सर्व विभागांनी जिल्हास्तरीय नियोजनात संसाधनांचा प्रभावी वापर करावा, अशा सुचना दिल्या.**




यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, केंद्रीय भूमिजल बोर्डाच्या वैज्ञानिक सायली टेंभुर्णे, वैज्ञानिक पौर्णिमा बाराहाते यांच्यासह राज्य शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात केंद्रीय भूमिजल बोर्डाच्या वैज्ञानिक सायली टेंभुर्णे यांनी प्रास्ताविकाने केली. त्यानंतर वैज्ञानिक पौर्णिमा बाराहाते यांनी जळगाव जिल्ह्यासाठी राष्ट्रीय जलचर मॅपिंग अंतर्गत प्राप्त निष्कर्ष, जलचर वैशिष्ट्ये, भूजल संसाधने, व्यवस्थापन धोरणे तसेच सीजीडब्लूबी डेटा पोर्टलवरील माहितीबाबत सविस्तर सादरीकरण केले.

यावेळी राष्ट्रीय जलचर मॅपिंग अहवाल, जळगाव जिल्हा तसेच जिल्हा पुनर्भरण योजना अधिकृतपणे सामायिक करण्यात आली. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी भूजल डेटा प्रसार व डेटा पोर्टलच्या विकासासाठी सीजीडब्लूबीच्या प्रयत्नांचे कौतुक केले तसेच सर्व विभागांनी जिल्हास्तरीय नियोजनात या संसाधनांचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन केले.

कार्यशाळेचा समारोप सहभागी अधिकाऱ्यांच्या अभिप्रायाने झाला. या कार्यशाळेत डब्लूआरडी, डब्लूसीडी, जिल्हा परिषद लघुसिंचन, कृषी विभाग आदी विभागांतील एकूण १६ अधिकारी सहभागी झाले होते.

## गोदावरी अभियांत्रिकीत गुणवंताचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

गोदावरी पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष डिप्लोमा परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग विभागात वृषिका माहुरकरने ९४.२२% गुण मिळवून प्रथम तर गणितात १०० पैकी १०० गुण मिळवून अतुलनीय कामगिरी केली. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील ललित जितेंद्र पाटील यांनी ८७.८८% गुण मिळवून प्रथम क्रमांक संपादन केला तर गणितात १०० पैकी १०० गुण मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा प्राचार्य, व्यवस्थापन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत रायसोनी स्कूलचे यश

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय कराटे यंग मोडो चॅम्पियनशिप स्पर्धेत जी.एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. स्पर्धेत स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पदके पटकावल्यामुळे स्कूलला विशेष प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.**



**चौघांना सुवर्ण तर सहा जणांना रौप्यपदक...**
स्पर्धेत हुसेन जमाली, आरव कोगटा, नंदिनी सूर्यवंशी आणि जेनील गाला यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक तर मोक्तीका, रिदम चोरडिया, विहान मुथा, हुसेन जमाली, गार्गी ठाकरे आणि विशान मुथा यांनी रौप्यपदक प्राप्त केले.

जी.एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर स्कूलने कराटे स्पर्धेत आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

शहरात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय कराटे यंग मोडो चॅम्पियनशिप स्पर्धेत जी.एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या चार खेळाडूंनी सुवर्ण तर सहा जणांना रौप्यपदक प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका क्रिस्टाबेल परेरा यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संचालिका पलक रायसोनी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## १४ ते १६ जानेवारीपर्यंत मद्यविक्री बंद

प्रतिनिधी । जळगाव

शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने जळगाव महानगरपालिका हद्दीच्या कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान व १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या अनुषंगाने मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवण्याची तरतूद आहे. त्यानुसार जळगाव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची प्रक्रिया शांततेत, निर्भय व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जळगाव महानगरपालिका हद्दीतील सर्व ठोक व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे आदेश देण्यात येत आहे.

# 'महापालिका निवडणूक एक जळगावकर'वर उद्या चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे रविवार, दि.११ रोजी दुपारी २ वाजता मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे 'महानगरपालिका निवडणूक- एक जळगावकर' या विषयावर महाचर्चेचे आयोजन करण्यात आले आहे.**

कार्यक्रमात एक जळगावकर म्हणून शहराकडून आपल्या काय अपेक्षा आहेत, कोणत्या गोष्टी घडाव्यात असे वाटते. कोणत्या समस्यांवर तोडगा निघावा अशी इच्छा आहे, हे जाणून घेण्यासाठी एक सकारात्मक व्यासपीठ म्हणून या महाचर्चेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात काही प्रमुख पक्षांचे नेते व पदाधिकारी शहराच्या विकासाबाबत आपले व्हिजन मांडणार आहेत. नागरिकांनी आपले प्रश्न, सूचना कार्यक्रमाच्या पंधरा मिनिटे आधी लेखी स्वरुपात द्यावे. चर्चा फक्त जळगावच्या विकासाबाबत सकारात्मक असावी. कुणावर टीका करणे टाळू या आणि विकासासाठी विधायक विचार मांडू या, असा रोटरी वेस्टचा प्रयत्न असल्याचे कळविण्यात आले आहे.

**उपस्थितीचे आवाहन...**
सर्व नागरिकांसाठी हा कार्यक्रम खुला असून मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन अध्यक्ष गौरव सफळे, प्रोजेक्ट सेक्रेटरी देवेश कोठारी, ॲडमिन सेक्रेटरी महेश सोनी यांनी केले आहे.

## पान १ वरुन

**केंद्रीय अर्थसंकल्प......**

मध्यमवर्गीयांना दिलासा मिळण्याची अपेक्षा - २०१७ पासून मोदी सरकारने अर्थसंकल्प मांडण्याची तारीख २८ फेब्रुवारीवरून १ फेब्रुवारी केली आहे. नवीन आर्थिक वर्ष (१ एप्रिल) सुरू होण्यापूर्वी सर्व वैधानिक प्रक्रिया पूर्ण व्हाव्यात, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातून देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यासोबतच, वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मध्यमवर्गीयांना कर सवलती किंवा इतर स्वरूपात दिलासा मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

**उमेदवारी अर्ज पुन्हा......**

मागणी केली जाऊ शकत नाही हे न्यायालयाला सांगितले गेले. न्यायालयानेही त्याला सहमती दर्शवली आणि याचिका फेटाळली. दरम्यान, प्रतिज्ञापत्रे किंवा प्रश्न-उत्तर पत्रके योग्य स्वरूपात नसल्याच्या अथवा कायदेशीररित्या आवश्यक नसलेली पोलीस, पाणी, कर, मलनिस्सारण आणि मालमत्ता यासह पाच विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) सादर करण्यात अयशस्वी झाल्याच्या कारणास्तव बहुतांश उमेदवारांचे अर्ज फेटाळले गेले आहेत.

**लाडक्या बहिणींच्या खात्यात......**

मकर संक्रांतीची मोठी भेट मिळणार असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, येत्या १४ जानेवारीपूर्वी म्हणजेच मकर संक्रांतीच्या आधी राज्यातील पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यांचे एकत्रित ३००० रुपये जमा करण्यात येणार आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी समाज माध्यमावर पोस्ट करत लाडकी बहीण योजनेची माहिती दिली आहे.

**भाजप म्हणजे 'आस्तीन......**

लिए लोग, कही बार अपने बाप बदल देते है,' अशा शेरोशायरी केली. तसेच मागील काळात यांच्याच घरात महापौर पद व यांच्यात घरात विरोधी पक्ष नेतापद असताना देखील यांनी कवडीचाही विकास केला नाही. त्यामुळे यावेळेस यांचा पराभव करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या चारही उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन डॉ. ठाकूर यांनी केले.

# एआयमुळे कामात सहजता आली असली तरी मानवी बुद्धीला पर्याय नाही

## उद्योजक गजेंद्र पाटील यांचे प्रतिपादन; विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप

प्रतिनिधी । जळगाव

**एआयमुळे उद्योगातील कामात सहजता, सुरक्षितता आली असून कार्यक्षमतेतवाढ झाली आहे. आर्थिकदृष्टया एआय तंत्रज्ञान परवडणारे आहे, त्यामुळे गुणवत्तेतवाढ झालेली आहे. असे असले तरी मानवी बुध्दीला पर्याय नाही, असे प्रतिपादन जी.पी. टेक सेफ्टीचे संचालक गजेंद्र पाटील यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेव्दारा रसायन अभियांत्रिकी व संलग्न विज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा व ज्ञानविनिमय या विषयावर दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचा समारोप नुकताच झाला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व निर्धारण कक्षाचे संचालक प्रा.समीर नारखेडे, पी.एम.उषा समन्वयक प्रा.एस.आर. कोल्हे, संचालक ए.के. गोस्वामी, अधिसभा सदस्य प्रा.विशाल पराते, सहसमन्वयक आर.जे. शिरसाम आदी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.समीर नारखेडे यांनी, या आंतरराष्ट्रीय परीषदेतून मिळालेले संशोधन विषयीचे ज्ञान व माहितीचा वापर करुन केमीकल अभियांत्रिकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करावे असे सांगितले.



**५६ संशोधन निबंधांची तोंडी सादरीकरणासाठी निवड...**
या परिषदेत देशभरातील नामांकित शैक्षणिक व संशोधन संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर संशोधन निबंध प्राप्त झाले, ज्यातून या विषयाचा व्यापक राष्ट्रीय प्रभाव स्पष्ट झाला. परीक्षणानंतर ५६ संशोधन निबंधांची तोंडी सादरीकरणासाठी निवड करण्यात आली, तर १२५ संशोधन निबंध पोस्टर स्वरूपात सादर करण्यात आले. यासोबतच देश-विदेशातील तज्ज्ञांनी १७ आमंत्रित व्याख्याने सादर करून परिषदेच्या तांत्रिक दर्जात आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनात भर घातल्याची माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. शिरसाम यांनी दिली. सहभागी तीन विद्यार्थ्यांनी त्यांची मते व्यक्त केली.

**कार्यक्रमात यांचा झाला सत्कार**
कार्यक्रमात उत्कृष्ठ सादरीकरण केलेल्या अंकित पाटील, विनोद पालखे, विलास जगताप, राणी गुप्ता, हर्षल पाटील यांना तर उत्कृष्ठ पोस्टर सादरीकरण प्रझेटेंशनबाबत सारिका पवार, तेजस भोई, उमझा नाझ शेख इक्बाल, रुपाली शिंपी, निलेश बेलसारे, प्रिती बोबाडे, चंद्रशेखर पाटील, शिवराज ढोले, भुषण बारी, श्रुतिका टोंगसे, भक्ती देशमुख यांना स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# तोरणमाळ परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

## १० जानेवारीपर्यंत रस्ता दुरुस्त न झाल्यास ग्रामस्थांचा रास्ता रोकोचा इशारा

प्रतिनिधी । शहादा

**महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेले आणि जिल्ह्याची पर्यटन शान असलेले तोरणमाळ आज मूलभूत सुविधांच्या अभावामुळे अडचणीत सापडले आहे. प्रसिद्ध पर्यटन व धार्मिकस्थळ असूनही तोरणमाळ परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत धडगाव तालुक्यातील अनेक महत्त्वाचे रस्ते अक्षरशः शेवटच्या घटका मोजत असल्याचे भयावह चित्र समोर आले आहे. या रस्त्यांची १० जानेवारीपर्यंत दुरुस्ती न झाल्यास प्रकाशा ता. शहादा येथील तापी पुलावर रास्तारोको करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

खडकी, फलई, झापी, सिंधीदिगर, कुंड्या, भाबरी, भादल यांसह अनेक गावांना जोडणारे रस्ते पूर्णतः खराब झाले असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने हे रस्ते अपघातांना आमंत्रण देत आहेत. विशेष म्हणजे खडकीसिंधीदिगर हा मार्ग सुमारे १५ पेक्षा अधिक गावपाड्यांसाठी एकमेव संपर्काचा रस्ता असून याला कोणताही पर्यायी



**१० जानेवारीपर्यंत संबंधित रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही तर प्रकाशा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. अपघातात एखाद्या निष्पाप व्यक्तीचा बळी गेला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर व विभागावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करत असून, आता तरी प्रशासन जागे होणार का? असा प्रश्न परिसरात उपस्थित केला जात आहे.**

मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे या गावांचा तोरणमाळ व इतर भागांशी संपर्क तुटण्याच्या मार्गावर आहे. तोरणमाळ हे परिसरातील मुख्य बाजारपेठेचे गाव आहे. आदिवासी बांधव दैनंदिन बाजार, उपचार, शासकीय कामकाज तसेच शिक्षणासाठी जीव धोक्यात घालून या रस्त्यांवरून पायी व वाहनांद्वारे प्रवास करत आहेत. या दुर्दैवी रस्त्यांवर आतापर्यंत अनेक लहान-मोठे अपघात झाले असून, काही निष्पाप नागरिकांना आपला जीवही गमवावा लागल्याचे नागरिक सांगतात. मात्र वारंवार होणाऱ्या अपघातांनंतरही संबंधित विभाग व अधिकारी कुंभकर्णी झोपेतच असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. परिसरात कार्यरत असलेले शिक्षक, आरोग्य कर्मचारी, महसूल व इतर शासकीय कर्मचारी यांनाही खराब रस्त्यांमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. वेळेवर सेवा पोहोचविणे कठीण झाले असून पर्यटन व्यवसायावरही याचा मोठा विपरीत परिणाम झाला आहे. पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तोरणमाळच्या पर्यटन विकासाला मोठा फटका बसत आहे. दरम्यान, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने आता ग्रामस्थ आक्रमक भूमिकेत येण्याच्या तयारीत आहेत.

# रखडलेली वेतनवाढ विरोधात बीएसएनएलच्या कर्मचाऱ्यांची निदर्शने



प्रतिनिधी । धुळे

**● आंदोलक कर्मचाऱ्यांच्या मते, २००७ पासून नवीन वेतन करार झालेला नाही**

गेल्या १८ वर्षांपासून रखडलेली वेतनवाढ आणि प्रशासकीय अन्याया विरोधात धुळे येथील बीएसएनएल कर्मचारी व अधिकारी संघटनांनी एकत्र येत आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. २०२० मध्ये सुमारे ८० हजार कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देऊनही अद्याप वेतन करार लागू न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. यासाठी गुरुवार दि. ९ रोजी बीएसएनएलच्या धुळ्यातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन निदर्शने केली.

बीएसएनएल ही केवळ नफा कमावणारी कंपनी नसून, दुर्गम भागात सेवा देणारी सरकारी संस्था आहे, असे नमूद करत कर्मचाऱ्यांनी तिसरा वेतन सुधारणा करार तत्काळ लागू करण्याची मागणी केली. प्रशासकीय खर्च निम्म्याहून कमी झाला असतानाही, नफा-तोटा या तांत्रिक करणास्थव कर्मचाऱ्यांना हक्काच्या पगारवाढीपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तसेच दिल्लीतील मुख्यालय, तमिळनाडू आणि चेन्नई येथील कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत असंवेदनशील असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या भूमिकेबद्दल मनोगत व्यक्त केले

यामध्ये संजय नागणे, अरविंद चव्हाण, लोकेंद्र मंडलोय, दीपक महाजन, विशाल तिवारी, मंजूर अली, सुनील पाटील, वसंत पाटील, नाना कापडे, विमल पाटील, सीमा बोरसे, अनिता पाटील, जहाँगीर तडवी व इतर कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**● आंदोलन अधिक तीव्र करण्याचा केला निर्धार**

**या आंदोलनात भारतीय संचार निगम लिमिटेडच्या सर्व कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेऊन निदर्शने केली. या प्रमुख संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

# धुळे येथे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती रॅली

प्रतिनिधी । धुळे

झुलाल भिलाजीराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय वाडीभोकर रोड धुळे तसेच धुळे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जानेवारी २०२५ रोजी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली होती.

रॅलीदरम्यान झुलाल भिलाजीराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. रितेश परदेशी, मेघना पाटील, तनिष्का चत्रे, प्रतीक्षा निकम, प्राजक्ता खेडकर, जय चौधरी, सात्विक तनेजा या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. धुळे महानगरपालिका शिक्षण मंडळ समुह प्रमुख अधिकारी शरद पवार व एजाज खान पठाण यांनी मार्गदर्शन केले. जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट धुळे चे सचिव शरद बच्छाव व संचालक निलेश पाटील यांनी हिरवा झेंडी दाखवून




रॅलीला सुरुवात झाली. जयहिंद चौकात पथनाट्य सादर झाले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य एन.एस.चव्हाण, उपप्राचार्य प्रा. डी. के. पाटील, उपप्राचार्य प्रा .मनिषा पाटील ,पर्यवेक्षक प्रा .दीपक चौधरी सर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. शितल पाटील, प्रा. कविता भडागे,प्रा. संगीता पाटील, यांनी योगदान दिले.



## मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी पथनाट्य, रॅलीद्वारे जनजागृती

प्रतिनिधी । धुळे

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रशासनाकडून मस्वीपफ अंतर्गत विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून शहरातील देवपूर, वाडीभोकर रोड, मोहाडी उपनगर परिसरात विविध शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून मतदार जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. शहरातील विविध शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या पथनाट्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. मतदान करणे ही केवळ आपली जबाबदारी नसून ते लोकशाहीतील सर्वात मोठे कर्तव्य आहे, हा संदेश या देण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक एस. एस. पाटील, उपमुख्याध्यापक आर. एस. शिंदे, पर्यवेक्षक ए. आर. पाटील यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# निवडणूक प्रचारामुळे उमेदवारांकडून रिक्षांची वाढली मागणी

प्रतिनिधी । धुळे

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू झाली असून, त्याचा सर्वाधिक लाभ हा रिक्षा व्यावसायिकांना होत आहे. उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात रिक्षांची मागणी वाढली असून, अनेकांनी तर चार दिवसांसाठी रिक्षा आगाऊ आरक्षित करून ठेवल्या आहेत. त्यामुळे रिक्षा चालकांच्या कमाईत वाढ झाली आहे.

प्रचारासाठी स्पीकर लावून रिक्षातून मतदानासाठी जाहीर आवाहन केले जात असल्याने अशा रिक्षांना विशेष मागणी आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये दिवसभर स्पीकर लावून फिरणाऱ्या रिक्षा जनमानसापर्यंत उमेदवारांचा संदेश पोहोचवण्यासाठी सर्वात प्रभावी माध्यम ठरत आहेत. काही रिक्षा चालकांकडे दोन-तीन रिक्षा असल्याने ते अतिरिक्त चालक लावून काम सुरू ठेवतात.



यामुळे त्यांची रोजची कमाई दुप्पट-तिपटीने वाढत असल्याचे सांगितले जाते.

निवडणूक प्रचारासाठी उमेदवारांना रिक्षा अगोदरच आरक्षित करुन ठेवाव्या लागत आहेत. प्रचारासाठी सकाळपासून उशिरापर्यंत रिक्षांची सतत धावपळ असली, तरी चांगली कमाई होत असल्यामुळे रिक्षाचालक समाधान व्यक्त करत आहेत. प्रत्येक निवडणुकीत असा सीझन असतोच, पण यंदा प्रचाराची मागणी आणखी वाढलेली दिसते, असे अनेक रिक्षा चालकांचे म्हणणे आहे.

# राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी सोढा विद्यालयाच्या राहुल चौरेची निवड

प्रतिनिधी । नवापूर

नवापूर येथील श्रीमती प्रतापबा अभेसिंग सोढा सार्वजनिक मराठी हायस्कूल व हाजी ए. एम. व्होरा कनिष्ठ महाविद्यालयातील अष्टपैलू खेळाडू राहुल चौरे याची १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा दि. १० ते १५ जानेवारी या कालावधीत सुरत (गुजरात) येथे आयोजित करण्यात आली आहे. ही राष्ट्रीय खो-खो स्पर्धा खो-खो इंडिया यांच्या नियोजनाखाली तसेच आशियाई खो-खो महासंघ आणि आशियाई ऑलिंपिक परिषद यांच्या मान्यतेने संपन्न होत आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे सराव शिबिर दि. ८ व ९ जानेवारी रोजी पालघर येथे पार पडणार आहे. या उल्लेखनीय यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक नरेश जयस्वाल व प्रियांशू जयस्वाल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. राहुल चौरेच्या या गौरवपूर्ण निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिनभाई चोखावाला यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# तळोद्यात प्रवासी महासंघातर्फे वाहनांना संरक्षण कवच बसविण्याचा उपक्रम

प्रतिनिधी । तळोदा

शहरातील स्मारक चौकात तालुका प्रवासी महासंघ ग्राहक पंचायत व पोलीस ठाण्याचे संयुक्त विद्यमाने मकर संक्रांतीच्या पर्वावर पतंग उडविताना नायलॉन मांजा वापरण्याचे दुष्परिणाम यामुळे होणारे अपघात हे टाळण्यासाठी व यापासून संरक्षण होण्यासाठी वाहनांना प्राथमिक तत्वावर सुरक्षा कवच तार बसवून नायलॉन व चायना मांजा न वापरणेबाबत सामाजिक जनजागृती करण्यात आली.

यासाठी सामाजिक प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित करण्यात




आला. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, पोलीस निरीक्षक राजन मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश साळी हे उपस्थित होते. त्यांचे हस्ते वाहनांना सुरक्षा कवच तार लावून वाहन चालकांना त्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष प्रा. संजयकुमार शर्मा सचिव अशोक सूर्यवंशी, तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष ॲड. अल्पेश जैन, ग्राहक पंचायतीचे तालुका अध्यक्ष रमेश कुमार भाट, सचिव शरद सूर्यवंशी, पंडित भामरे प्राध्यापक राजाराम राणे, चेतन धनका, राजेश चौधरी, रशिलाबेन देसाई, उमिबेन तुरखिया, गोपनीय पोलीस अंमलदार विजय सोनवणे, वाहतूक हवालदार भटेंद्र साळुंखे, महेश महाले, आधी उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक राजन मोरे, ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष प्रा डॉ. संजय शर्मा, तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष ॲड. अल्पेश जैन, अशोक सूर्यवंशी, माजी अध्यक्ष प्रा. रमेश मगरे, जिल्हा उपाध्यक्ष कीर्ती कुमार शहा यांनी नायलॉन मांजा वापरण्याचे दुष्परिणाम व होणारे अपघात याबाबत घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

**● प्रवासी महासंघाच्या या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल जनमानसातून कौतुक करण्यात येत आहे.**

# नाल्यावर पूल नसल्यामुळे शेतकऱ्यांनी पदरमोड करून तयार केला रस्ता

## नाल्यात पाणी वाहत असल्याने ऊस काढणी अडचणीत; बोरद परिसरातील शेतकऱ्यांना दरवर्षी होतोय मनस्ताप

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यातील बोरद परिसरातील शेतकऱ्यांना ऊस वाहतुकीसाठी दरवर्षी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नाल्यावर कायमस्वरूपी पूल नसल्याने शेतकऱ्यांना स्वखर्चाने मातीचा भराव करून तात्पुरता रस्ता तयार करावा लागतो. यावर्षीही जानेवारी महिना सुरू झाला असतानाही नाल्यात पाणी वाहत असल्याने ऊस काढणी अडचणीत आली आहे. त्यामुळे बोरद येथील शेतकल्यांनी एकत्र येत स्वखचनि रस्ता व पूल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

या गंभीर समस्येबाबत बोरद येथील शेतकऱ्यांनी आ. राजेश पाडवी यांची भेट घेऊन रस्त्याची व नाल्यावरील पुलाची मागणी केली होती. यावेळी आ. पाडवी यांनी संबंधित नाल्यावर लवकरात लवकर पुलाचे बांधकाम करण्यात येईल, तसेच हा रस्ता पाणंद रस्ता योजनेअंतर्गत मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, आ. पाडवी यांच्या आदेशानुसार संबंधित विभागाकडून रस्ता व नाल्याचे मोजमाप करून पुलासाठी आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.

दरवर्षी ऊस तोडणीच्या काळात शेतकरी स्वखर्चाने मातीचा भराव करून रस्ता तयार करतात. यंदा मात्र नाल्यात पाणी असल्याने ऊस काढणीस विलंब होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे. या रस्त्यावरून सुमारे २० ते २५ शेतकऱ्यांची ऊस वाहतूक होते. त्यामुळे रस्ता तातडीने पुनर्बांधणी करणे अत्यावश्यक झाले आहे. तसेच २०० ते २५० एकर ऊस शेतकऱ्यांना नाल्यातूनच काढावा लागतो. दरम्यान, रस्ता उभारणीसाठी सर्व शेतकऱ्यांनी वर्गणी गोळा केली असून यासाठी अंदाजे दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत खर्च



अपेक्षित आहे. जे.सी.बी. ची मजुरी तासाला सुमारे ११०० रुपये, तसेच सुमारे ३० फूट लांबीचे तीन पाईप टाकण्यात येणार आहे. त्यामुळे पाईपांचे साधारण वीस हजार रुपये किंमतीचे वापरण्यात येणार आहेत, अशी माहिती शेतकरी घनश्याम पाटील यांनी दिली.

या उपक्रमात मनिष पाटील, घनश्याम पाटील, रणछोड पाटील, विठ्ठल पाटील, अशोक चौधरी, अमरिष चौधरी, दत्तू रोहिदास पाटील, सुवर्णा चौधरी, संगीता पाटील, आपसिग पावरा, गिरीष पावरा, लाला पावरा, विशाल पावरा, सुभाष पावरा मनिष चौधरी आदी शेतकरी सक्रिय सहभागी आहेत. शेतकऱ्यांच्या या एकजुटीमुळे तात्पुरती अडचण दूर होत असली तरी नाल्यावर कायमस्वरूपी पुलाचे काम लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा परिसरातील शेतकरी व्यक्त करत आहेत.

**आ.राजेश पाडवी यांच्या आदेशावरून मागील तीन महिन्यांवर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे. शेतकऱ्यांचे शेतातील अवजड वाहन काढण्यासाठी पूल प्रस्तावित केला आहे. मंजुरी मिळाल्यास लवकरच पुलाच्या कामास सुरुवात होईल.**

**- नितीन वसावे,**
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम, तळोदा

माझी २० एकर शेती ह्याच रस्त्यावर आहे. वडिलोपार्जित शेती असल्याने तेव्हापासून नदीमधूनच प्रवास करतो. माझ्यासह ह्या परिसरात २५० शेतकऱ्यांना पूल व रस्त्याअभावी त्रास सहन करावा लागत आहे. शेतातील ऊस परिपक्व झाला आहे. त्याची तोडणी करणे आवश्यक असून आर्थिक गणित स्थिर राहील. आम्हाला शेतीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे शेतातील येणारे यंदाचे उत्पन्न रस्त्यात व पुलातच टाकावे लागेल. यावर्षी अजूनपर्यंत नाल्याला पाणी आहे. त्यामुळे लोकवर्गणीद्वारे कच्च्या पुलाचे बांधकाम करण्यात येत आहे.

**- घनश्याम पाटील,** शेतकरी बोरद

# जळगाव जिल्हा



# भुसावळात अमृत योजनेवरून राजकीय वाद पेटला

## १०० गुन्हे दाखल झाले तरी जनसेवेचे व्रत कायम ठेवणार – युवराज लोणारी

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील अमृत पाणीपुरवठा योजनेंतर्गत उभारल्या जाणाऱ्या जलकुंभांच्या कामावरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये राजकीय वाद चांगलाच पेटला आहे.**



प्रभाग क्रमांक १९ मधील जुन्या तालुका पोलीस स्टेशन शेजारील तसेच गंगाराम प्लॉट परिसरातील संतोषी माता मंदिराजवळील जलकुंभांच्या कामांना अडथळा आणल्यास थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांनी दिल्यानंतर भाजपकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांनी मंत्री संजय सावकारे यांच्या कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की, शंभर गुन्हे दाखल करा, आम्ही धमक्यांना घाबरत नाही. आम्ही काम बंद पाडलेले नाही, तर केवळ मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी गेलो होतो. जनतेच्या पाणी प्रश्नात राजकारण होऊ नये. भाजप शहरातील विकासकामांसाठी कायम तत्पर असून राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला नगरसेवक पिंटू कोठारी, किरण कोलते, परिक्षित बऱ्हाटे आदी उपस्थित होते. दरम्यान, माजी आमदार संतोष चौधरी यांनी प्रभाग १९ मधील जलकुंभ बांधकामावर आक्षेप घेत भाजप नगरसेवकांवर स्टंटबाजीचा आरोप केला. मूळतः या जागेवर व्यापारी संकुल मंजूर असताना जलकुंभ उभारण्याचा अट्टहास का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संतोषी माता सभागृहाजवळ खोदकामातील माती टाकण्यात आल्याने जागा पचवण्याचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणात मुख्याधिकारी राजेंद्र फातले यांनी गंगाराम प्लॉट परिसरातील संतोषी माता मंदिराजवळील जलकुंभाचे काम तात्पुरते थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच, विकासकामांची गुणवत्ता तपासूनच बिले अदा केली जातील, असे नगराध्यक्षा गायत्री भंगाळे यांनी स्पष्ट केले आहे.

**भाजपकडून आरोपांचा इन्कार करण्यात आला आहे. युवराज लोणारी यांनी सांगितले की, अमृत योजनेच्या फेज-१ मधील टाकीचे काम तीन महिन्यांपासून सुरू असताना अचानक बंद का करण्यात आले? याचा जाब विचारला. चुकीच्या व नियमबाह्य कामांना विरोध राहील, मात्र शहराच्या विकासासाठी नगराध्यक्षांच्या पाठिशी २७ नगरसेवक खंबीरपणे उभे राहतील. केंद्र व राज्य शासनाची ही महत्वाकांक्षी अमृत पाणीपुरवठा योजना शहरासाठी महत्त्वाची असताना, राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे कामांच्या गतीवर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. हा वाद लवकर मिटून शहरातील पाणीप्रश्न सुटावा, अशी अपेक्षा भुसावळकर व्यक्त करीत आहेत.**

# वड्री येथे आ.जावळेंच्या निधीमधून विविध विकासकामांचे भूमिपूजन



प्रतिनिधी । यावल

यावल-रावेर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अमोल हरिभाऊ जावळे यांच्या स्थानिक विकास निधीमधून यावल तालुक्यातील विविध गावांमध्ये विकास कामांचे व जनसामान्यांच्या मूलभूत सुविधा असलेल्या कामांचे भूमिपूजन सोहळा दि. ७ जानेवारी रोजी पार पडला. त्यामध्ये महादेव मंदिर, सभागृहासाठी व स्मशानभूमी बांधकामासाठी भूमिपूजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी राज्य परिषद सदस्य हिरालाल चौधरी होते. तसेच जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती हर्षल पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सविता भालेराव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रभाकर सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उज्जैनसिंग राजपूत, यावल तालुका माजी सरचिटणीस विलास चौधरी, खरेदी-विक्री संघ व्हा. चेअरमन अतुल भालेराव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंकज चौधरी, राज्य अनुसूचित जमाती सदस्य मीना तडवी, सलीम तडवी सावखेडेकर, यावल मंडळ भाजपा अध्यक्ष सागर कोळी, यावल मंडळ सरचिटणीस भरत पाटील, ज्ञानेश्वर तायडे, वडरी गावचे सरपंच अजय भालेराव, वडरी विकास सोसायटी चेअरमन उमाकांत पाटील, लीलाधर चौधरी, सुभाष पाटील, सुनील पाटील, पद्माकर पाटील, अरुण पाटील, ग्रामसेवक आर. एन. तडवी आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### संत बाबा हरदासराम यांचा जयंती महोत्सव उत्साहात

**भुसावळ ।** येथील सिंधी कॉलनीत संत बाबा हरदासराम सेवा मंडळ (गोधडीवाले बाबा का कुवा ट्रस्ट) द्वारा परमपूज्य संत बाबा हरदासराम साहेब यांचा १२१वा जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यात पंचामृत स्नान, मदाह साहेब, आरती साहेब तसेच महाप्रसादाचे वाटप तसेच साई देवीदास साहेब यांचे सत्संग पार पडला. या सत्संगात संतांच्या विचारांवर प्रवचन तसेच जागतिक शांती आणि मानव कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमास बाबा सुनीलकुमार, साई देविदास साहेब, जयराम आगीचा व समस्त सिंधी समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील मलकापूर, नागपूर, बोदवड, अमळनेर सह मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर व गुजरात राज्यातील बारडोली येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्राम महसूल विभागातर्फे शेतसारा भरण्याचे आवाहन

**शिंदी, ता. भुसावळ ।** महसूलतर्फे शेतसारा वसुली कार्यक्रम १ ऑगस्ट ते ३१ जुलै या दरम्यान राबविण्यात येत असतो. जानेवारी महिना सुरू झाला असून पाहिजे त्या प्रमाणात शिंदी, मोंढाळा या दोन्ही महसुली गावात शेतसारा अजून पाहिजे त्या प्रमाणात जमा झाल्याचे दिसून येत नाही. आर्थिक वर्षात जमीन महसुलाची आकारणी आणि थकबाकी वसुली केली जाते. महसुली नोंदी अद्यावत ठेवणे शेतसारा जमा करणे आणि शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणे आदी कामे गावपातळीवर महसूल अधिकारी करतात. शिंदी मोंढाळा या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी शेतसारा त्वरित जमा करण्याचे आवाहन महसूल अधिकारी रुपेश लिधोरकर यांनी केले आहे.

# औष्णिक विद्युत केंद्रातील पाईप चोरी उघडकीस : तिघांना अटक, एक फरार

प्रतिनिधी । वरणगाव

**वरणगाव पोलिसांनी दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रातील मोठ्या चोरीचा उलगडा केला आहे. चोरी झालेल्या लोखंडी पाईप्स व इतर मुद्देमाल जप्त करून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर चौथा आरोपी अद्याप फरार आहे.**

पोलीस तपासात समोर आले की, दि. १६ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ दरम्यान आरोपींनी अंदाजे २ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल ट्रॅक्टर आणि ट्रॉलीत भरून जंगलात लपवण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी चोरी कबूल केली असून, पोलिसांनी त्यांच्याकडून ३१ तुकडे पाईप्स, गंजलेला ऑक्सिजन सिलेंडर, घरगुती गॅस हंडी आणि गॅस कटर जप्त केले आहेत. वरणगाव पोलिसांनी सांगितले की, आरोपींनी अजून काही गुन्ह्यांमध्ये सहभाग घेतला आहे की नाही हे तपासणे, तसेच फरार आरोपीचा शोध घेणे हा पुढील टप्प्यातील उद्देश आहे. आरोपींना भुसावळ न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलिस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक अमितकुमार बागुल यांचे गोपनीय माहितीवरून पथक नेमण्यात आले. ही कारवाई पथकातील उपनिरीक्षक मंगेश बेंडकोळी, उपनिरीक्षक जितेंद्र जैन, पोलिस सुकराम सावकारे, गोपीचंद सोनवणे, ईश्वर तायडे, भूषण माळी, मनोज म्हस्के आदींनी केली.

# लोहाऱ्याची माही काळे राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम

प्रतिनिधी । पाचोरा



येथील मूळ रहिवासी व सध्या बोईसर येथे वास्तव्यास असलेली माही गजानन काळे या अवघ्या ६ वर्षांच्या चिमुकलीने नुकत्याच नाशिक येथे पार पडलेल्या राष्ट्रीय पातळीवरील 'जि. चॅम्प अबॅकस' स्पर्धेत १०० पैकी ९९ गुण मिळवत प्रथम क्रमांक (श्रेणी-१) पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिला भव्य ट्रॉफी व सुवर्णपदक प्रदान करून 'जि. चॅम्प सुपरस्टार' ही मानाची पदवी देऊन गौरविण्यात आले आहे. बोईसर येथे चिन्मया विद्यालयात इयत्ता पहिलीत शिक्षण घेणाऱ्या कु. माहीचे वडील बोईसर येथे डॉक्टर म्हणून वैद्यकीय सेवा बजावत आहेत. माहीने आपल्या दृढ निश्चय, सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर हे उज्ज्वल यश संपादन करून आपल्या कुटुंबासह मुळ गाव लोहारा तसेच बोईसर व शाळेचेही नाव उज्ज्वल केले आहे. सदर राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी आयोजित करण्यात आली होती. हा सन्मान सोहळा नाशिक येथील धनलक्ष्मी लॉन्स येथे पार पडला. या स्पर्धेचे मार्गदर्शन 'जि. चॅम्प'चे संचालक योगेश देशमाने व आरती देशमाने यांनी केले.

# आदर्श शिक्षक, पालक आणि सासऱ्याची भूमिका बजावणाऱ्या योगदानाला वंदन- डॉ. पाटील

प्रतिनिधी । जामनेर

एक व्यक्तीआदर्श शिक्षकांची भूमिका बजावित असतांना रक्ताचे पाणी करून भावी पिढ्या घडविण्याचे महान कार्य करतो. त्यासोबत त्याला अनेक भूमिकाही पार पाडाव्या लागतात कौटुंबिक जबाबदाऱ्यामध्ये आदर्श व्यक्ती, पती, मित्र, पालक, सासरा अशा किती तरी भूमिका एकाच व्यक्तीला कराव्या लागतात. जीवनात ही भूमिका पार पाडतांना आपल्या स्वप्नाची राखरांगोळी होत असते. अशा शिक्षकांच्या योगदानाला वंदन केलेच पाहिजे, असे हृदयस्पर्शी मनोगत डॉ. राधा पाटील यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केले. तालुक्यातील जांभूळ जि.प.शाळेचे आदर्श मुख्याध्यापक अशोक पाटील यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन वाकोद येथील जैन कृषी फार्म येथे करण्यात आले होते. या सोहळ्यात सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक पाटील यांच्या सून डॉ. राधा पाटील या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जि.प.चे उपशिक्षणाधिकारी विजय सरोदे तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख हेमंत पाटील, काशीनाथ पाटील, संगीता पाटील, डॉ.जितेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

# वरणगाव येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

प्रतिनिधी । वरणगाव

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्री शक्तीपीठ पुणे यांच्यातर्फे कार्यक्रमाचे आयोजन संत सावता महाराज मंदिर येथे वरणगाव माळी समाज यांच्या सहकार्याने करण्यात आले. अध्यक्षस्थानी माळी समाजाध्यक्ष संजय माळी होते.

कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सावित्रीच्या लेकींचा सन्मान प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुभाष महाजन समन्वयक सावित्री शक्तीपीठ पुणे, अरुण माळी समन्वयक जळगाव एरंडोल, प्रभाकर चौधरी अध्यक्ष माळी समाज बऱ्हाणपूर, हभप विलास महाराज, विश्वास सर सहसंबंध सावित्री शक्तिमान पुणे, सुधाकर विठ्ठल महाजन रावेर समन्वयक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सविता माळी, नगरसेविका मनीषा माळी, नगरसेविका दीपाली माळी, भारती थोरात, सुनीता माळी, लक्ष्मी बैरागी, निर्मला जवरे, ज्योती गुरव, नीलिमा झोपे, रेखा देशमुख, मनीषा पाटील, सोनिया लोंढे, सुवर्णा धनगर, सरुबाई वाघमारे, कलाबाई माळी, पंच कमिटी ज्ञानेश्वर माळी, निवृत्ती माळी, सुभाष माळी, दिनकर माळी, ज्ञानेश्वर माळी, रमेश माळी, विश्वनाथ माळी, लहू माळी, सुनील माळी, जगन्नाथ माळी, कृष्णा माळी, नितीन माळी, निलेश माळी, गजेंद्र माळी, विकास माळी, दगडू माळी, रामदास माळी, सखाराम माळी, कुंदन माळी, सचिन निवृत्ती माळी, गोविंदा माळी, अरुण माळी, सुरेंद्र थोरात, सचिन माळी आदींनी परिश्रम घेतले.

# अमळनेरच्या उपनगराध्यक्षपदी प्रशांत निकम यांची निवड

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसह चार स्वीकृत नगरसेवकांच्या नामनिर्देशनाबाबत शहरात गेल्या काही दिवसांपासून उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर ही प्रतीक्षा संपली असून शहरातील नामांकित बिल्डर व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले प्रशांत निकम यांची अमळनेर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.**



ही निवड आज दि. ९ जानेवारी रोजी दुपारी सव्वा तीन वाजता नगरपरिषदेच्या विशेष सभेत करण्यात आली. या सभेचे पीठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी काम पाहिले. यावेळी उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसह चार स्वीकृत (नामनिर्देशित) नगरसेवकांच्या नावांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ मधील कलम ५१-अ (१-अ) उपकलम ९ नुसार नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून आल्यानंतर त्यांच्या नावांची राजपत्रात प्रसिद्धी झाल्यापासून २५ दिवसांच्या आत उपनगराध्यक्षाची निवड करणे बंधनकारक आहे. तसेच कलम ५१-ब नुसार नगरपरिषदेत नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांच्या निवडीसाठी विशेष सभा घेणे आवश्यक असते. या कायदेशीर तरतुदीनुसार ही प्रक्रिया पार पाडण्यात आली.

उपनगराध्यक्ष प्रशांत निकम (अपक्ष गट), स्वीकृत (नामनिर्देशित) नगरसेवक शिंदे सेना गट : गुलाबराव पाटील, मोहन सातपुते, तालुका व शहर विकास आघाडी : डॉ. डिगंबर महाले, अपक्ष गट : प्रताप साळी, निवडीनंतर उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांचे नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, नगरसेवक व उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. या निवडीमुळे नगरपरिषदेच्या कारभाराला गती मिळेल तसेच शहराच्या विकासकामांना चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उपनगराध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारताना प्रशांत निकम यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# खासगी व सरकारी भावात प्रचंड तफावत

## • खरेदी सुरू नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान



प्रतिनिधी । अमळनेर

**शहरासह तालुक्यात कालबाह्य वाहनांतून शाळकरी विद्यार्थ्यांची वास्तव समोर आले आहे.**

**भरड धान्य खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावे आणि २०२४-२५ च्या खरीप हंगामाचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ टाकण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, असे पत्र तहसीलदार आणि एरंडोल शेतकी संघाच्या व्यवस्थापक आणि सचिवाला देण्यात आले आहे.**

**– मयूर भंगाळे,**
प्रांताधिकारी,

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप हंगामाची शासकीय भरड धान्य खरेदीचे आदेश आल्यानन्तर देखील खरेदी सुरू न झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

त्वरित खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांतर्फे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांकडे केली आहे. मार्केटिंग फेडरेशनचे प्रभारी जिल्हा पणन अधिकारी एस.एस. मेने यांनी एरंडोल शेतकी संघाला अमळनेरच्या खरेदी केंद्राची परवानगी दिलेली असून भरड धान्य खरेदीची सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. खुल्या बाजारात मक्याला १४०० ते १५०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे तर ज्वारीला २४०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. मात्र शासकीय खरेदीसाठी मक्याला २४०० रुपये प्रतिक्विंटल भाव तर ज्वारीला ३६९९ रुपये प्रति क्विंटल भाव जाहीर केला आहे. त्यामुळे वेळेवर खरेदी झाली असती तर शेतकऱ्यांचा फायदा झाला असता. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. अमळनेरात अद्यापही भरड धान्य खरेदी सुरू न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. त्वरित खरेदी सुरू करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा कृउबा संचालक प्रा. सुभाष पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश पाटील, प्रताप पाटील, दिनेश पवार, सुनील पाटील यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांच्याकडे केली आहे.

**अमळनेर गोदाम उपलब्ध नाही मात्र टाकरखेडा रस्त्यावर नवीन शासकीय गोदाम बांधण्यात आले आहे. त्याची क्षमता तपासून सुरू करून खरेदी केलेला माल तेथे ठेवण्यात येईल.**

**रुपेशकुमार सुराणा,**
तहसीलदार

# म्हसास शाळेत चिमुकल्यांचा कलाविष्कार व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । पाचोरा

तालुक्यातील लोहारा येथून जवळच असलेल्या म्हसास येथील जि.प. प्राथमिक शाळेत नुकताच चिमुकल्यांचा कलाविष्कार व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल गंगाराम राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून पाचोरा शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी विजय पवार, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी समाधान पाटील, लोहारा केंद्राचे केंद्रप्रमुख जि. ग. पाटील, गट साधन केंद्र समन्वयक शिवदे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करून, दीप प्रज्वलन व फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर जाधव सरांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण केल्यानंतर व्यासपीठावरील व प्रमुख मान्यवरांचे शाळेच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आले.

**श्री गणपती बाप्पाचे आव्हान पर नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमात देशभक्तीपर, ऐतिहासिक, बालगीत, भक्तीगीत, श्रीसेवालाल जी महाराज गीत, लावणी, दिंडी नृत्य, साउथ मिक्स इ. नृत्य, सामाजिक, शैक्षणिक, शेतकरी कष्टकरी नाटक चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतात गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी कार्यक्रमाच कौतुक केले व चिमुकल्यांना प्रोत्साहन दिले. तसेच मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचा स्वागत सत्कारही केला. चिमुकल्या कलाकारांचे पालक बंधू भगिनींनी बक्षीस देऊन कौतुक केले.**

या कार्यक्रमातच मान्यवरांच्या हस्ते शाळेतून बदली झालेल्या ज्येष्ठ भगिनी प्राजक्ता जळतकर व सर जिल्हा परिषद मुलांची शाळा.) म्हंसास ता. पाचोरा, जि. जळगाव यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून ज्यांनी शाळेत सेवा दिली अशा अर्चना पाटील यांचा ही स्वागत सत्कार करण्यात आला. शाळेसाठी नेहमी सहकार्य व मदत करणारे म्हसास, रामेश्वर गावातील शिक्षणप्रेमी व दात्यांचे शाळेच्या वतीने शब्दसुमानांनी व प्रत्यक्षदर्शी स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास म्हसास तथा रामेश्वर गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा सर्व सदस्य, म्हसास, रामेश्वर गावातील माजी सरपंच, उपसरपंच सर्व सन्माननीय सदस्य, म्हसास, रामेश्वर गावातील पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष सर्व सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, सर्व सदस्य, म्हसास, रामेश्वर गावातील ज्येष्ठ नागरिक, शिक्षण प्रेमी, गावातील पत्रकार बंधू, तसेच लोहारा केंद्रातील शहापुरा शाळेचे मुख्याध्यापक रत्नाकर पाटील, लोहारा कन्या शाळेचे मुख्याध्यापक भुत्ते, कासमपुरा शाळेचे मुख्याध्यापक परदेशी, लोहारा बॉईज केंद्र शाळेतील कुमावत, बागुल मॅडम, ताडगे, सूर्यवंशी, नाचनखेडा जि.प. शाळेचे उपशिक्षक पाटील, जि. प. शाळा साजगाव चे मुख्याध्यापक दीपक पाटील उपस्थित होते. कलाविष्कार चिमुकल्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य व पालक प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले. व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे, हुसेन साऊंड सिस्टिमचे संचालक आदिल शेख शेंदुर्णी, व्हिडिओ शूटिंग ज्यांनी केली असे भूषण शिवदे व उपस्थितांचे मुख्याध्यापकांनी आभार मानले.